स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। बुधवार ।
दि. 08 एप्रिल 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## ४१ अनधिकृत झोपड्या तसेच बांधकामांवर निष्कासनाची कारवाई

# वाकड-म्हातोबानगर परिसरात महापालिकेची अतिक्रमण निर्मूलन मोहीम

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाने विकास आराखड्यात आरक्षित असलेल्या वाकड-म्हातोबानगर येथील २४ मीटर डिपी रस्त्यावरील १५०० चौरस मीटर जागेवरील ४१ अनधिकृत झोपड्या तसेच बांधकामांवर निष्कासनाची कारवाई केली. रस्ता रुंदीकरणाच्या अनुषंगाने ही कारवाई करण्यात आली असल्याची माहिती उप आयुक्त अण्णा बोदडे यांनी दिली.**



पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाचे उपआयुक्त अण्णा बोदडे यांच्या अधिपत्याखाली क्षेत्रीय अधिकारी अश्विनी गायकवाड, कार्यकारी अभियंता आर. व्ही. शिंदे, दळणवळण विभागाचे कार्यकारी अभियंता चंद्रकांत मोरे यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे.

महापालिका स्थापत्य, झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभाग, प्रशासन व स्थापत्य, शहरी दळणवळण विभाग, नगररचना विभाग, विद्युत विभाग, अतिक्रमण विभाग, अग्निशामक व महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान यांनी संयुक्तपणे ही कारवाई केली.

> पिंपरी चिंचवड शहरातील प्रमुख रस्ते व सार्वजनिक सुविधा सक्षम, सुरक्षित आणि दीर्घकालीन दृष्टीने सक्षम करण्यासाठी अतिक्रमण हटविणे अत्यावश्यक आहे. शहराची वाढती लोकसंख्या, वाहतुकीचा ताण आणि भविष्यातील गरजा लक्षात घेता रस्ते रुंदीकरण ही केवळ प्रशासकीय कारवाई नसून नागरिकांच्या दैनंदिन जीवनमान उंचावण्याशी थेट संबंधित बाब आहे. अशा कारवायांना नागरिकांनी सहकार्य केल्यास अशा कारवाया अधिक सुलभ, पारदर्शक आणि परिणामकारक पद्धतीने राबविता येतील. शहर अधिक सुंदर, सुबक आणि सुसज्ज करण्यासाठी प्रत्येक नागरिकाची भूमिका महत्त्वाची असून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि भविष्यातील सोयीसुविधांसाठी महापालिकेच्या अशा उपक्रमांना सकारात्मक प्रतिसाद देत रस्ता रुंदीकरण कारवाईस नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करतो.
>
> - डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.

### नियोजनबद्ध शहर विकासासाठी नागरिकांचे सहकार्य गरजेचे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखड्यात विविध सार्वजनिक सुविधा, रस्ते व पायाभूत प्रकल्पांसाठी जागा आरक्षित करण्यात आलेली आहे. शहराचा नियोजित आणि सुटसुटीत विकास साधण्यासाठी या आरक्षित जागा अतिक्रमणमुक्त ठेवणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे नागरिकांनी विकास आराखड्यातील आरक्षित जागांवर कोणत्याही प्रकारचे अनधिकृत बांधकाम किंवा अतिक्रमण करू नये. तसेच, आरक्षित जागांवरील अतिक्रमणांमुळे भविष्यात विकासकामांमध्ये अडथळे निर्माण होतात आणि अशा अतिक्रमणांवर नियमानुसार निष्कासनाची कारवाई केली जाईल, याचीही नागरिकांनी नोंद घ्यावी. नियोजनबद्ध शहर विकासासाठी नागरिकांचे सहकार्य अपेक्षित असल्याचे महापालिकेच्या वतीने सांगण्यात आले आहे.

## पिंपरी-चिंचवड महापालिकेत रिक्त पदे भरण्यासाठी महापौरांचा पुढाकार

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील विविध विभागांमध्ये मोठ्या प्रमाणावर अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त होत असल्याने निर्माण झालेल्या रिक्त पदांचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर महापौर रवि लांडगे यांनी रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत प्रशासनाला निर्देश दिले आहेत. महापौरांनी नमूद केले की, शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत प्रशासनिक यंत्रणा सक्षम राहणे अत्यावश्यक आहे.**




सध्या अनेक विभागांमध्ये मनुष्यबळ अपुरे असल्याने नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्व विभागांनी विद्यमान तसेच आगामी काळात रिक्त होणाऱ्या पदांची माहिती तात्काळ सादर करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, आवश्यक त्या पदांसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करून भरती प्रक्रिया गतीमान करण्यावरही भर देण्यात आला आहे. मा. महापौर कार्यालयामार्फत या प्रक्रियेचा नियमित पाठपुरावा करण्यात येणार आहे.

तसेच, आवश्यक त्या पदांसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करून भरती प्रक्रिया गतीमान करण्यावरही भर देण्यात आला आहे. मा. महापौर कार्यालयामार्फत या प्रक्रियेचा नियमित पाठपुरावा करण्यात येणार आहे.



> शहराचा झपाट्याने होत असलेला विकास आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता सक्षम प्रशासन ही काळाची गरज आहे. रिक्त पदांमुळे नागरिक सेवेत कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी आवश्यक त्या सर्व पदांची भरती तातडीने करण्यात यावी. तसेच या प्रक्रियेत कोणताही विलंब न होता शासनाकडे प्रस्ताव सादर करून मंजुरी मिळवावी, यावर महापालिकेने प्राधान्याने कार्यवाही करावी.
>
> – रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

# ‘पीएमआरडीए’ घरकुलांची बुधवारी सोडत!

## १,०२९ सदनिकांसाठी ५,३१७ पात्र अर्ज: ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात होणार प्रक्रिया

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) पेठ क्रमांक १२ आणि ३०-३२ मधील गृहप्रकल्पातील शिल्लक १,०२९ सदनिकांची सोडत जाहीर केली आहे. बुधवारी (८ एप्रिल २०२६) सकाळी ११ वाजता आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात ही सोडत पार पडणार आहे. या प्रक्रियेत ५,३१७ पात्र अर्जदारांचे भवितव्य ठरणार असून, ‘पीएमआरडीए’ने याची सर्व तयारी पूर्ण केली आहे.**





या गृहयोजनेसाठी एकूण ५,३६७ अर्जदारांनी अनामत रकमेचा भरणा केला होता. अर्जांच्या छाननीनंतर ५० अर्जदारांची कागदपत्रे अपूर्ण असल्याने त्यांना अपात्र ठरविण्यात आले आहे. त्यामुळे उर्वरित ५,३१७ अर्जदार आता या सोडत प्रक्रियेत नशीब आजमावतील.

ही सोडत प्रक्रिया ‘म्हाडा’ने विकसित केलेल्या ‘IHLMS २.०’ या संगणकीय प्रणालीद्वारे राबविण्यात येणार आहे. यात मानवी हस्तक्षेपास वाव नसल्याने प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक असेल, असे ‘पीएमआरडीए’च्या सहआयुक्त (जमीन व मालमत्ता) पूनम मेहता यांनी स्पष्ट केले. महानगर आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली आणि ‘पीएमआरडीए’च्या सनियंत्रण समितीच्या देखरेखीखाली ही सोडत पार पडणार आहे.

### थेट प्रक्षेपणाची सुविधा :

सोडत प्रक्रियेवेळी इच्छुक अर्जदारांनी उपस्थित राहावे, असे आवाहन ‘पीएमआरडीए’ने केले आहे. ज्यांना प्रत्यक्ष उपस्थित राहणे शक्य नाही, त्यांच्यासाठी थेट प्रक्षेपणाची सोय करण्यात आली आहे. या प्रक्रियेची ‘यूट्यूब लिंक’ (YOUTUBE LINK) सर्व पात्र अर्जदारांना एसएमएसद्वारे पाठविण्यात येईल, अशी माहिती ‘पीएमआरडीए’कडून देण्यात आली.

### सदनिका आणि पात्र अर्जदारांची स्थिती :

- पेठ क्र. १२ (EWS): ८१ सदनिकांसाठी २,१८२ अर्जदार
- पेठ क्र. १२ (LIG): ३९३ सदनिकांसाठी १,९७५ अर्जदार
- पेठ क्र. ३०-३२ (EWS): ३२७ सदनिकांसाठी ४५६ अर्जदार
- पेठ क्र. ३०-३२ (LIG): २२८ सदनिकांसाठी ७०४ अर्जदार

# शहराच्या क्रीडा क्षेत्रात आमदार जगताप यांचे योगदान : अभिषेक बारणे

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**आमदार शंकरभाऊ जगताप यांनी शहराच्या सर्वांगीण विकासासोबतच क्रीडा क्षेत्रालाही नेहमीच प्राधान्य दिले आहे. त्यांच्या नेतृत्वात खेळाडूंसाठी उत्कृष्ट सोयी-सुविधा उपलब्ध होत आहेत. ‘आमदार चषक’ सारख्या व्यासपीठामुळे स्थानिक स्तरावरील गुणवान खेळाडूंना आपली प्रतिभा सिद्ध करण्याची संधी मिळत आहे, असे प्रतिपादन स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी केले.**






चिंचवड विधानसभेचे आमदार शंकरभाऊ जगताप यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून काळेवाडी येथे भव्य ‘आमदार चषक’ बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवारी सकाळी काळेवाडीतील ज्योतिबा उद्यान येथील छत्रपती शिवाजी महाराज बॅडमिंटन कोर्टवर या स्पर्धेचे उद्घाटन स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते.

खेळ केवळ हार-जितीसाठी नसून तो आयुष्यात शिस्त आणि जिद्द निर्माण करतो.” हीच तरुण पिढी भविष्यात सक्षम भारत घडवेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या सोहळ्याला राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी हजेरी लावली होती. यावेळी, नगरसेवक बाबासाहेब त्रिभुवन, नगरसेविका सविता खुळे, सामाजिक कार्यकर्ते विनोद तापकीर, नरेश खुळे, विलास पाडाळे, सचिन काळे, सागर तापकीर यांसह इतर मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेचे यशस्वी आयोजन गोपाळ माळेकर आणि पवना हेल्थ क्लबच्या टीमने केले आहे.

आमदार शंकरभाऊ जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या स्पर्धेने परिसरातील क्रीडाप्रेमींचे लक्ष वेधून घेतले असून, स्थानिक खेळाडूंमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. या प्रेरणादायी उपक्रमाबद्दल उपस्थित मान्यवरांनी आयोजकांचे विशेष अभिनंदन केले.



> आमदार शंकरभाऊ जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित “आमदार चषक” स्पर्धेमुळे काळेवाडी परिसरातील क्रीडा संस्कृतीला नवी चालना मिळाली असून, आगामी काळात अशा स्पर्धांमधून नव्या प्रतिभेला हक्काचे मैदान मिळाले आहे.
>
> -अभिषेक बारणे, सभापती स्थायी समिती, पिंपरी चिंचवड महापालिका.

# सायबर सुरक्षित भारतासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा

## चिंचवड येथील प्रतिभा महाविद्यालयाचे राष्ट्रीय स्तरावर सायबर क्षेत्रात दैदिप्यमान यश

**महाईन्यूज । पिंपरी चिंचवड**

**चिचवड येथील 'प्रतिभा वाणिज्य आणि संगणक अध्ययन महाविद्यालया'ने सायबर सुरक्षा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत राष्ट्रीय स्तरावर आपला ठसा उमटवला आहे. क्विक हील फाउंडेशनच्या "सायबर शिक्षणासाठी सायबर सुरक्षा" या महत्त्वपूर्ण उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय कार्यक्रमात महाविद्यालयाच्या सायबर क्लबने उत्कृष्ट प्रदर्शन करत "सर्वोत्कृष्ट सर्वंकष (ओव्हर ऑल) सायबर क्लब" या गटात द्वितीय उपविजेतेपद पटकावण्याचा बहुमान मिळवला.**



### वैयक्तिक स्तरावरही उत्कृष्ट यश

या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी वैयक्तिक स्तरावरही उत्कृष्ट यश संपादन केले. आकाश ठाकूर यांनी "सर्वोत्कृष्ट सचिव" या विभागात प्रथम उपविजेतेपद मिळवले. तसेच स्नेहा तेली आणि साकीब चौधरी यांना "सर्वोत्कृष्ट सायबर योद्धा संघ" हा पुरस्कार प्राप्त झाला. श्रावणी सावंत यांना "सर्वोत्कृष्ट कामगिरी (सर्वोत्कृष्ट अध्यक्षा)" हा सन्मान मिळाला; तर मानसी वाडेकर यांना "सर्वोत्कृष्ट माध्यम संचालक" या विभागात नामांकन मिळाले. तसेच, हर्षिता वच्छानी यांना "सर्वोत्कृष्ट शिक्षक समन्वयक" या विभागात नामांकन मिळाले असून, ही बाबदेखील महाविद्यालयासाठी अत्यंत अभिमानास्पद ठरली आहे.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीइटी) पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निक उपविजेत्या मुलांच्या फुटबॉल संघात अनिकेत खोसे, राजवीर आखाडे, रवीतेज यादव, सागर माळगी, यश नगरे, हर्ष गंगावणे, सर्वेश धनावडे, परीक्षित पोवार, जय क्षेत्री आणि क्षितिज पवार यांचा समावेश होता.

विजयी संघाला संघ व्यवस्थापक पी. एल. देवतळे, हरिश नागले, गणेश पेंदोर, क्रिडा समन्वयक सुनिल जगताप, किशोर गव्हाणे, लक्ष्मी थकुरडे, प्राचार्य डॉ. विद्या बॅकॉड यांनी मार्गदर्शन केले. पीसीइटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, युवा उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी उपविजेत्या संघाचे अभिनंदन केले. देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी हा कार्यक्रम महत्त्वपूर्ण ठरला. या स्पर्धेत विविध राज्यांतील अनेक महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता. प्रतिभा महाविद्यालयाच्या सायबर क्लबने सातत्यपूर्ण प्रयत्न, नावीन्यपूर्ण उपक्रम आणि समाजामध्ये सायबर सुरक्षेविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या कार्यामुळे या स्पर्धेत आपले विशेष स्थान निर्माण केले.

या पुरस्कारांचे वितरण 'क्विक हील फाउंडेशन'च्या अध्यक्षा अनुपमा काटकर आणि 'महाराष्ट्र सायबर'चे उपमहानिरीक्षक संजय शिंत्रे यांच्या हस्ते पुणे येथे करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कार्याचे कौतुक करत, सायबर सुरक्षेच्या क्षेत्रात तरुणांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे नमूद केले.

या कार्यक्रमास प्रतिभा शैक्षणिक संकूलचे संस्थापक सचिव डॉ . दीपक शाह, प्राचार्या क्षितिजा गांधी, शिक्षक समन्वयिका डॉ. हर्षिता वाच्छानी, तसेच सायबर क्लबचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. या दैदिप्यमान यशाबध्दल महाविद्यालयाच्या वतीने आयोजित कौतूक सोहळ्यात संस्थापक, सचिव डॉ. दीपक शहा म्हणाले, या यशामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास अधिक दुणावला असून, भविष्यात सायबर सुरक्षा क्षेत्रात आणखी मोठे योगदान देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. महाविद्यालयाच्या या यशस्वी वाटचालीमुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळत असून, 'सायबर सुरक्षित भारत' घडविण्यासाठी युवा पिढी सज्ज असल्याचे चित्र यातून स्पष्ट होत आहे. यावेळी संस्थेच्या खजिनदार डॉ . भूपाली शहा , संचालिका डॉ. तेजल शहा , मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ . राजेंद्र कांकरीया आदीनी शुभेच्छा दिल्या. यावेळी , प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

# १३८ विद्यार्थी, १२ महाविद्यालये आणि 'कॉल ऑफ ड्युटी'चा थरार!

**महाईन्यूज । पिंपरी चिंचवड**

**डिजिटल युगातील नव्या खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी गेमफोर्ज ई-स्पोर्ट्स क्लबच्या वतीने आयोजित 'इन्फिनिक्स कॅम्पस कनेक्ट' (INFINIX CAMPUS CONNECT) हा उपक्रम नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. या स्पर्धेत शहरातील १२ नामांकित महाविद्यालयांतील १३८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत आपल्या गेमिंग कौशल्याचे प्रदर्शन केले.**



कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण 'कॉल ऑफ ड्युटी' (MOBILE) ही स्पर्धा होती. तब्बल १५ हजार रुपयांचे बक्षीस आणि आकर्षक भेटवस्तू (GOODIES) जिंकण्यासाठी स्पर्धकांमध्ये मोठी चुरस पाहायला मिळाली. या प्रसंगी 'फ्री फायर'चे प्रसिद्ध कास्टर आणि हायड्रा ई-स्पोर्ट्सचे ऑपरेशन्स लीड वेद भाकडे तसेच लोकप्रिय कंटेंट क्रिएटर जय भांगर यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ई-स्पोर्ट्स क्षेत्रातील करियर आणि संधींबाबत त्यांनी दिलेले सल्ले विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी संस्थेचे संचालक डॉ बी बी वाफारे,'डीन-स्टुडंट अफेयर्स' डॉ. सुनील महाजन आणि प्रा. जयवंत भूमकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थी प्रतिनिधी मधुर घाटे (अध्यक्ष) आणि शिवम सामंत (उपाध्यक्ष) यांच्या नेतृत्वाखाली स्वयंसेवकांनी कार्यक्रमाचे चोख नियोजन केले होते. गेमिंगसोबतच नेटवर्किंग आणि नवीन गोष्टी शिकण्यासाठी हा एक उत्तम प्लॅटफॉर्म ठरल्याची भावना सहभागी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

# आमदार जगताप मित्र परिवाराची सामाजिक बांधिलकी!

## आमदार शंकर जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त पिं.चिं. मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना प्लेट वाटप

**महाईन्यूज |**
**पिंपरी चिंचवड**

**चिंचवड विधानसभेचे आमदार शंकरभाऊ जगताप यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून 'आमदार शंकरभाऊ जगताप मित्र परिवार'च्या वतीने शहरात एक स्तुत्य सामाजिक उपक्रम राबवण्यात येत आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या तब्बल २५ हजार विद्यार्थ्यांना जेवणासाठी प्लेट वाटप करण्याचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.**



> आमदार शंकरभाऊ जगताप यांनी नेहमीच शालेय विद्यार्थ्यांच्या हिताला प्राधान्य दिले आहे. महापालिका शाळांमधील मुलांची गरज ओळखून त्यांना २५ हजार जेवणाचे प्लेट वाटप करणे, ही त्यांची संवेदनशीलता दर्शवते. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील समाधान हीच आमदार शंकरभाऊ जगताप यांच्या वाढदिवसाची खरी भेट आहे.
>
> – रविना आंगोळकर, सभापती, शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड महापालिका.

> वाढदिवसानिमित्त केवळ उत्सव साजरा न करता समाजातील शेवटच्या घटकापर्यंत उपयुक्त मदत पोहोचवणे ही जगताप परिवाराची परंपरा आहे. २५ हजार विद्यार्थ्यांना जेवणासाठी दर्जेदार प्लेट देऊन आमदार शंकरभाऊ जगताप मित्र परिवाराने सामाजिक बांधिलकीचा नवा आदर्श शहरासमोर ठेवला आहे. हा उपक्रम अत्यंत नियोजनबद्ध आणि कौतुकास्पद आहे.
>
> – अभिषेक बारणे, अध्यक्ष, स्थायी समिती, पिंपरी चिंचवड महापालिका.

वाढदिवसाच्या निमित्ताने होणारी अनावश्यक होर्डिंगबाजी आणि खर्च टाळून थेट विद्यार्थ्यांच्या दैनंदिन उपयोगी पडणारी वस्तू भेट देण्याचा निर्णय आमदार शंकरभाऊ जगताप मित्र परिवाराने घेतला आहे. महापालिकेच्या विविध प्राथमिक शाळांमध्ये या वाटप प्रक्रियेचा शुभारंभ करण्यात आला असून, टप्प्याटप्प्याने शहरातील २५ हजार विद्यार्थ्यांपर्यंत ही मदत पोहोचवली जात आहे. या उपक्रमात महापौर रवीभाऊ लांडगे, उपमहापौर शर्मिलाताई बाबर यांच्यासह सर्व प्रभागातील नगरसेवक, नगरसेविका तसेच आजी माजी पदाधिकारी यांनी सहभाग घेतला असून, त्यांच्या हस्ते प्लेट चे वाटप करण्यात येत आहे.

या उपक्रमामुळे महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून पालकांनीही या उपक्रमाचे स्वागत केले आहे, अशी माहिती पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळ सभापती रविना आंगोळकर यांनी दिली आहे.

# भोसरीतील कुस्ती मैदान गाजवले; स्वराज काळभोरचा दमदार विजय!

**महाईन्यूज |**
**पिंपरी चिंचवड**

**भोसरी येथे पार पडलेल्या कुस्ती मैदानात आकुर्डीचा युवा पैलवान स्वराज काळभोर याने येरवड्याच्या सनी जाधववर शानदार विजय मिळवत प्रेक्षकांची मने जिंकली. तब्बल वीस मिनिटे रंगलेल्या या चुरशीच्या लढतीत स्वराजने अखेर एकचाक डाव साधत प्रतिस्पर्ध्याला मात दिली आणि मैदानात जल्लोष उसळला.**



या दमदार कामगिरीबद्दल स्वराज काळभोर याला मानाचा 'नाथसाहेब केसरी' किताब, मानाची गदा आणि ५१ हजार रुपयांचे बक्षीस देऊन गौरविण्यात आले. भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार पैलवान महेश लांडगे, माजी नगरसेवक वसंत नाना लोंढे आणि अजित गव्हाणे यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला.

स्वराजच्या या यशाचे संपूर्ण शहरातून कौतुक होत असून त्याने आपल्या खेळातून भविष्यात मोठी भरारी घेण्याचे संकेत दिले आहेत. तो अनुपदादा मोरे स्पोर्ट्स फाउंडेशन संचलित 'राजा शिवछत्रपती कुस्ती संकुल' येथे नियमित सराव करतो. यावर्षी त्याने दोन वेळा राष्ट्रीय विद्यापीठ स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभाग घेतला असून तो शालेय राज्यस्तरीय कांस्यपदक विजेता आहे.

शैक्षणिक क्षेत्रातही स्वराज प्रगती करत असून तो सध्या पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये बीटेक (कॉम्प्युटर सायन्स)चे शिक्षण घेत आहे. कुस्तीचा वारसा त्याला घरातूनच लाभला आहे. त्याचे आजोबा स्वर्गीय बाळासाहेब काळभोर हे महाराष्ट्र चॅम्पियन होते, तर रघुनाथ काळभोर हे पुणे जिल्ह्यातील नामांकित पैलवान म्हणून ओळखले जात होते. त्याचे वडील राजेश काळभोर हेही राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू असून सध्या त्यांच्या मार्गदर्शनाखाली स्वराज कठोर सराव करत आहे. परंपरा, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर स्वराज काळभोर याने मिळवलेले हे यश युवा खेळाडूंसाठी प्रेरणादायी ठरत आहे.